ISSN–2277- 8721
OPEN ACCESS
EIIRJ
ELECTRONIC INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL
Volume–XI, Issue– III May – June 2022
Original Research Article

# विधवा स्त्रियांच्या सामाजिक दर्जेत झालेले परिवर्तन : एक समाजशास्त्रीय अभ्यास

**प्रा. प्रकाश जनार्धन विजयाताई कोथळे**

*राजीव गांधी महाविद्यालय मुदखेड*
*ईमेल आयडी:* kprakash14061971@gmail.com

**गोषवारा**

*स्वातंत्र्याची पंच्याहत्तर वर्ष गणतंत्राची बाहत्तर वर्षे पूर्ण झाली. अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्य, शिक्षण, वीज,पाणी आणि सडक यामध्ये आपण प्रगती केलेली आहे. यातील शिक्षणाच्या संख्यात्मक आकडा पाहून चालणार नाही कारण संख्यात्मक आकडा फसवा असतो. तर गुणात्मक परिवर्तन काय झाले हे पाहावे लागते. स्त्री शिक्षणाचा गुणात्मक विचार केला तर शंभरपैकी आठ स्त्रिया कार्यात्मक साक्षर आहेत. ज्या कार्यात्मक साक्षर नाहीत ते आपले प्रश्न सोडवू शकतात का हा एक प्रश्न आहे. म्हणजेच ती आपले जे प्रश्न आहे त्या प्रश्नांना न्याय देऊ शकत नाही तेव्हा विधवांचा प्रश्न किती गंभीर आहे. हे लक्षात येते. मी जे नांदेड जिल्ह्यातील मुदखेड तालुक्यातील पाच गावांचे सर्वेक्षण केले त्यामध्ये विधवांकडे समाजाचा पाहण्याचा दृष्टिकोन विवाह, कर्ता पुरुष, जिम्मेदार व्यक्ती विवाहांतून विधवा झाल्यानंतर प्राप्त झालेला नकारात्मक दृष्टिकोन. हा नकारात्मक दृष्टिकोन समाज आजही नष्ट करू शकलेला नाही. विधवा झाल्यानंतर समाजात घरी होणारा आधार आजही कमी आहे तिने सामाजिक व आर्थिक गोष्टींबद्दल बोलू नये. कष्टाची कामे तिने करावी. तिचा अपमान करण्याची संधी किंवा समाज सोडत नाही. पुरुषाला पत्नी मिळाल्यानंतर तो सन्मान समाजामध्ये आहे तो विधवा स्त्रीला नाही. या सर्व गोष्टींचा प्रभाव तिच्या व्यक्तिमत्त्वावर पडतो त्यातून एक नकारात्मक दृष्टिकोन कायम राहतो त्यामुळे सामाजिक दर्जा उंचावत नाही. समाजाची सामाजिक सरचना एक विशिष्ट प्रकारे यासाठी कार्य करते. स्त्रीचा दर्जा उंचावण्यामध्ये पितृसत्ता धर्म संस्कृती आणि जातिव्यवस्था एक ग्रामीण समाजामध्ये आजही अडसर ठरत आहे. कार्यात्मक शिक्षण जेव्हापर्यंत स्त्रीला प्राप्त होत नाहीत तेव्हापर्यंत स्त्रियांचे आणि विधवांचे प्रश्न हे सुटू शकणार नाही. त्यासाठी तिला कार्यात्मक साक्षर होऊन लढा द्यावा लागेल. या लढा समाजातील सर्व घटकांचा समावेश आवश्यक आहे.*

**मुख्य शब्द:** *विधवा, सामाजिक दर्जा, भूमिका*

**Copyright © 2022 The Author(s):** This is an open-access article distributed under the terms of the Creative Commons Attribution 4.0 International License (CC BY-NC 4.0) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium for non-commercial Use Provided the Original Author and Source Are Credited.

## प्रस्तावना

स्वातंत्र्याला 75 वर्षे पूर्ण झाली व गणतंत्र याला 72 वर्षे पूर्ण झाली. आपल्या अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्य, शिक्षण या गरजांमध्ये आपण प्रगती करत आहोत या सर्व गोष्टीचा संख्यात्मक आकडा आपण नेहमी पाहत असतो संख्यात्मक आकडा हा नेहमीच खरा असतो, असे नाही त्यासाठी आपल्याला गुणात्मक तिकडे दुर्लक्ष करता येणार नाही. खऱ्या अर्थाने गुणात्मक विकास हाच खरा विकास असतो त्यासाठी आपण शिक्षणाचे आणि अन्नाचे उदाहरण घेऊ भारत अन्नामध्ये स्वयंपूर्ण झाला पण अजूनही सकस अन्न सर्वांना मिळत नाही. मात्र संख्यात्मक आकडा सांगतो की सर्वांना सकस अन्न मिळते. त्याचप्रमाणे संख्यात्मक शिक्षणामध्ये जर आपण विचार केला तर आपल्याला संख्यात्मक शिक्षण हे जास्त दिसते

संख्यात्मक प्रगती ही जास्त झाल्यासारखे वाटते पण खऱ्या अर्थाने प्रगती नसते जेव्हा पर्यंत स्त्री आणि पुरुष आपल्या सर्व गरजा आपल्या समस्या शिक्षणाच्या माध्यमातून सोडवू शकत नाही तोपर्यंत आपण त्याला परिपूर्ण शिक्षण म्हणता येत नाही. ही गोष्ट स्त्री आणि पुरुषांना दोघांनाही लागू होते आज स्त्रियांचा विचार केला तर समाजामध्ये स्त्रियांच्या समस्या सोडवण्याचे प्रमाण कमी आहे स्त्री ही पुरुषाच्या वरती जास्त अवलंबून आहे आपण या ठिकाणी स्त्री आणि विधवा स्त्रीचा विचार करणार आहो स्त्री जर ही दुसऱ्यावर अवलंबून असेल तर ती आपला दर्जा किंवा ते आपले प्रश्न कसे सोडवायचे हा प्रश्न माझ्यासमोर आहे शहरा मध्ये आणि ग्रामीण भागांमध्ये ही तफावत जास्त करून दिसून येते. साक्षरता आणि कार्यमूलक साक्षरता यामध्ये भेद केला जातो. भारतातील स्त्रिया ह्या कार्यमूलक साक्षर नाहीत आहे. तर त्यांचे प्रमाण अत्यंत नगण्य आहे जेव्हा ती स्त्री स्वतःचा विचार करेल आणि स्वतःचे प्रश्न स्वतः सोडवू शकेल तेव्हा खऱ्या अर्थाने ती कार्यमुलक झाली, असे म्हणता येते.

प्रथम आपण स्त्रीचा विचार करून नंतर विधवा स्त्रीचा विचार करू 8 मार्च जागतिक महिला दिन त्याचे औचित्य साधून आपण स्त्रीचा विचार केला तर लक्षात येते की, शहरातील स्त्री आणि ग्रामीण भागातील स्त्री यांच्या विकासामध्ये प्रचंड तफावत दिसून येते. माझे संशोधन हे ग्रामीण भागातील स्त्रियांच्या संबंधित विचार केला तर पदव्युत्तर शिक्षणापर्यंत फक्त पाच स्त्रिया असतात. त्यातही कार्य मूलक शिक्षित किती हे सांगता येत नाही. या पदवी झालेल्या स्त्रिया आपल्या पायावर उभे होईलच याची शाश्वती नाही. आता आपण विधवा स्त्रियांच्या दर्जाबद्दल पाहणार आहोत. विधवा स्त्रियांचा विचार केला तर लक्षात येते की विधवा स्त्रियांचे तीन प्रकार पडतात आणि विधवा कोणाला म्हणायचे हे आपल्याला त्यांच्या व्याख्येवरून ठरवता येते. विधवांना सामाजिक दर्जा मिळवताना कोणता संघर्ष करावे लागतात. तो या ठिकाणी आपण पाहणार आहोत त्यासाठी प्रथम आपण विधवा म्हणजे कोण हे पाहणे आवश्यक आहे. हिंदू धर्मानुसार ज्या स्त्रिचा पती स्त्रीच्या हयात लग्न झाल्यानंतर मृत्यू पावतो. अशा स्त्रीला विधवा म्हटले जाते. विधवाचे तीन प्रकार आपण वर सांगितलेल्या त्यामध्ये लग्नानंतर लगेच लग्नानंतर काही वर्षाने आणि पन्नासच्या नंतर असे तीन प्रकार आपल्याला पाहता येतात पहिल्या दोन स्त्रियांना जीवनामध्ये खूप मोठा संघर्ष करावा लागतो. तिसऱ्या विधवा स्त्रीला मात्र जीवनामध्ये फारसा संघर्ष करावा लागत नाही. आपण पहिल्या दोन विधवांच्या प्रश्नाबद्दल या ठिकाणी आपल्या संशोधनात पाहणार आहोत पतीच्या निधनानंतर स्त्रियांच्या जीवनामध्ये एकदम जो बदल होतो. त्या बदलाला समाजामध्ये मान्यता दिली जात नाही. धर्म आणि पुरुषप्रधान व्यवस्था त्याचप्रमाणे जातीव्यवस्था हे निर्णय घेईल त्याप्रमाणे समाजात स्त्रीला स्थान प्राप्त होते. तिचा सामाजिक दर्जा आर्थिक दर्जा राजकीय दर्जा आणि मानसिकता जात असा जैविक दर्जा की तिला ठरवता येत नाही. उदाहरणार्थ जर तिला दुसरे लग्न करायचे असेल तर समाजातील पुरुष तिच्याशी लग्न करताना अनेक वेळा विचार करतो. यासारखे अनेक प्रश्न तिच्या समोर उभी असतात तिला कुटुंबामध्ये आपल्या पती एवढाच दर्जा मिळेल का? हा एक महत्त्वाचा प्रश्न या ठिकाणी आपण शोधणार आहोत. परिवर्तनातील अभ्यास करणे म्हणजेच परिवर्तन या शब्दाचा संरचनेत परिवर्तन होणे असा आहे परिवर्तन म्हणजे बदल स्थानामध्ये बदल संस्थेमध्ये बदल भूमिकेमध्ये बदल भूमिका धारकांच्या क्षमता आणि अभिवृत्ति मध्ये बदल मालकी हक्कामध्ये बदल या अर्थाने परिवर्तन ही संकल्पना वापरतो. विधवा स्त्री आणि परिवर्तन ही संकल्पना पाहत असताना आपल्याला कोणकोणत्या गोष्टींमध्ये बदल झाला ते पाहणे आवश्यक आहे. सामाजिक संशोधन करत असताना अशा विधवा स्त्रीचा दर्जा मध्ये झालेला बदल याठिकाणी आपण पाहणार आहोत.

**संशोधन विश्व:** या ठिकाणी नांदेड जिल्ह्यातील मुदखेड तालुक्यातील काही गावातील आपण या ठिकाणी अभ्यास करणार आहोत मुदखेड पार्डी वैजापूर निवघा चिकाळा तांडा या गावातील पंचवीस विधवा स्त्रियांची प्रत्यक्ष मुलाखत घेण्यात येईल.

**नमुना निवड :** सहेतुक पद्धतीने पंचवीस विधवा स्त्रियांची मुलाखत घेण्यात येईल.

ISSN–2277- 8721
OPEN ACCESS
EIIRJ
ELECTRONIC INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL
Volume–XI, Issue– III May – June 2022
Original Research Article

**अध्ययनाचा उद्देश:** 1) विधवा स्त्रियांच्या दर्जाचे अध्ययन करणे. 2) शिक्षणाचा प्रचार व प्रसार झाल्यानंतर ही विधवा स्त्रियांची स्थिती जाणून घेणे. 3) विधवांना त्यांचे अधिकार मिळण्यामध्ये अडथळे घटकांचा अभ्यास करणे. 4) विधवांची सामाजिक स्थिती जाणून घेणे.

**गृहितके:** 1) विधवांची सामाजिक स्थिती सामाजिक दर्जा निर्मितीत पुरुषप्रधान व्यवस्था धर्म आणि जाती व्यवस्था अडचण आहे. 2) शिक्षणाच्या उपचारानंतर विधवा स्त्रियांची स्थिती चांगली झाली आहे.

**विश्लेषण व निर्वचन:** 1) आपणास अविवाहित माणसाने मागणी घातली का या प्रश्नाचे उत्तर विचारले असता 24 स्त्रियांनी नाही असे उत्तर दिलेत. एका स्त्रीने होय असे उत्तर दिले पण जो मुलगा तिला पाहायला आला होता तो एक तर अपंग होता किंवा आंधळा होता यावरून असे लक्षात येते की आजही विधवा स्त्रियांकडे पुरुषप्रधान व्यवस्था जातीव्यवस्था आणि धर्म हा कोणत्या दृष्टीने पाहतो ते लक्षात येते. आजही समाज योनी सूचीतेला जास्त महत्त्व देते हे लक्षात येते विधवा स्त्रियांना दुसरा प्रश्न विचारला तुम्हाला विवाहित स्त्रीप्रमाणे घरामध्ये आदर मिळतो का तर सर्व स्त्रियांनी त्याचे उत्तर नाही असे दिलेत तिसरा प्रश्न सासू सासरे दीर आपणास त्रास देतात का असा प्रश्न विचारला असता तर सर्व स्त्रियांनी व असे उत्तर दिलेत त्या मागचा हेतू तिने घर सोडून जावे किंवा एकदा आत्महत्या करावी हा होता चौथा प्रश्न आपणास कमी अपमानित केले जाते का याचेही उत्तर हो हेच होते आपणास घरचे लोक अपशकुनी समजतात का याचे उत्तरही 25 पैकी 24 स्त्रियांनी हो असेच दिले पाचवा प्रश्न त्यांना विचारला तो आर्थिक अशी संबंधित होता आपणाला घरातील संपत्तीमध्ये सासू-सासरे हिस्सा द्यायला तयार आहेत का असे विचारले असता 24 स्त्रियांनी नकारात्मक उत्तर दिले तर एका स्त्रीने होकारात्मक उत्तर दिले विधवा झाल्यानंतर घरातील लोकांचा दृष्टिकोन बदलत का असे प्रश्न विचारले असता 24 स्त्रियांनी हो असे उत्तर दिले एका स्त्रीने नाही असे तर दिले याचा अर्थ विधवा झाल्यानंतर घरातील व्यक्ती तसेच समाजातील व्यक्तीचा स्त्रीकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलतो हे लक्षात येते. या सर्व गोष्टींमध्ये तिला आणखी प्रश्न विचारण्यात आला की तुझ्या जैविकतेकडे घरातील लोक लक्ष देतात का? तर त्याचे उत्तरही नकारात्मकच होते.

**निष्कर्ष**

वरील विश्लेषण यावरून असे लक्षात येते की तिच्या दर्जा मध्ये परिवर्तन होण्यासाठी समाजव्यवस्थेतील जे महत्त्वाचे घटक आहेत त्यामध्ये धर्म, जातीव्यवस्था आणि पुरुषप्रधान व्यवस्था ही जास्त करून जबाबदार आहे जी तिला हक्क नाकारत असते त्यामुळे ग्रामीण विधवांचा प्रश्न अतिशय गंभीर बनतो. तिला प्रत्येक बाबतीत आपल्या सासू सासरा वर आणि दिरावर अवलंबून राहावे लागते. आर्थिकतेच्या बाबतीत विचार केला तर तिला तिचा वाटा देण्यास नकार दिला जातो ज्यामुळे ती आपली आर्थिक उन्नती करू शकत नाही किंवा सामाजिक उन्नती करू शकत नाही. तिला मिळणारी वागणूक ही सामान्यपणे अतिशय वाईट असते आणि गंभीरही असत घरचे लोक नकारात्मक दृष्टिकोनातून पाहत असताना समाज या गोष्टीचा अप्रत्यक्षपणे फायदा घेत असत. विधवापणामुळे तुझ्या मध्ये निर्माण झालेल्या नकारात्मक प्रभाव हा प्रत्येक क्षणी दिसून येतो तिची स्वातंत्र्य ओळख ही फारशी नसतेच तिला अपशकुनी समजणे या शब्दावरूनच बऱ्याच गोष्टी लक्षात येतात पुरुषाला ज्या ज्या गोष्टी प्राप्त होतात स्त्रीच्या मृत्युनंतरही त्या सर्व गोष्टी तिला प्राप्त होण्यास व दर्जा मिळण्यास बऱ्याच अडचणी आजही निर्माण होत आहे. या अडचणीवर मात करण्यासाठी तिला स्वतःला सर्व गोष्टी समजून घेणे आवश्यक आहे. ज्या गोष्टी मुळे तिच्यावर तिच्या गोष्टी लादल्या जातात. ते धर्मग्रंथ पुरुषप्रधान व्यवस्था आणि जातीव्यवस्था समजून घेणे फार आवश्यक आहे.

**उपाय**

१) मी मुलाखत घेतलेल्या 25. तर यापैकी 25 स्त्रिया कमीत कमी सातवी ते बीए झालेले आहेत याचा अर्थ त्यांनी शिक्षण घेतलेला आहे पण

ISSN–2277- 8721

EIIRJ

ELECTRONIC INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL

Volume–XI, Issue– III May – June 2022

Original Research Article

शिक्षणातून परिवर्तन होण्यासाठी जी एक दृष्टी लागते ती आजही त्या स्त्रियांमध्ये निर्माण झालेले नाही.

२) स्त्रियांच्या जीवनाकडे समाजातील व्यक्ती आणि धर्माचा दृष्टिकोन तो पर्यंत बदलत नाही तोपर्यंत स्त्रियांच्या सामाजिक दर्जात परिवर्तन होणे कठीण आहे.

३) साक्षरता आणि कार्य मुलक साक्षरता यामध्ये फरक आहे. जेव्हा पर्यंत स्त्रिया कार्यमूलक साक्षर होणार नाही तो पर्यंत तिला चिकित्सक पद्धतीने आपल्या समाज व्यवस्थेची चिकित्सा करता येणार नाही ग्रामीण भागांमध्ये आजही चिकित्सेचा प्रश्न गंभीर आहे.

४) स्त्रियांमध्ये पुरुषप्रधान संस्कृतीने रुजवले अडथळे हे त्यांनी स्वतः दूर करणे आवश्यक आहे ते जेव्हा दूर होतील तेव्हा त्या कार्यमुलक साक्षर झाले असे म्हणता येईल.

५) या सर्व गोष्टींचा विचार केला तर लक्षात येते की स्त्रियांच्या सामाजिक दर्जा मध्ये विशिष्ट धर्म पुरुषप्रधान व्यवस्था आणि जातीव्यवस्था ही प्रकर्षाने एक आडवी भिंत म्हणून उभी आहे. याचा चिकित्सक अभ्यास केल्याशिवाय स्त्रियांचे प्रश्न सुटणार नाही ग्रामीण स्त्रियांचे प्रश्न हे जास्तच गंभीर आहे आणि त्यातही विधवा स्त्रियांचे प्रश्न त्याहीपेक्षा गंभीर आहे. या गंभीर याचा विचार करूनच आपण यासाठी सर्वांनी मिळून प्रयत्न करणे आवश्यक आहे.

**संदर्भसूची**

१) भारतीय समाज - कमलेश महाजन

२) शुद्रा इन एनसीएनट इंडिया - राम सरण शर्मा, एम एल बी डी पब्लिकेशन

३) स्वामी विवेकानंद

४) स्त्री सेकंड सेक्स - सिमोन दि बुवा पद्मगंधा प्रकाशन

५) मनुस्मृती – भी. म. कोसल समता प्रकाशन

६) सामाजिक समस्या - प्रदीप आगलावे साईनाथ प्रकाशन

७) महात्मा फुले समग्र वाडमय - य दि फडके महाराष्ट्र शासन प्रकाशन

८) हिंदू कोड बिल डॉ. बाबासाहेब आंबेडकर

***Cite This Article:***

**प्रा. प्रकाश जनार्धन विजयाताई कोथळे**, *(2022)*. विधवा स्त्रियांच्या सामाजिक दर्जेत झालेले परिवर्तन : एक समाजशास्त्रीय अभ्यास, ***Electronic International Interdisciplinary Research Journal***, *XI (III) May-June, 228-231.*